Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
www.sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १३६ • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.१४ फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## अशोक चव्हाणांच्या हाती 'कमळ'

# फडणवीस,बावनकुळेंच्या उपस्थितीत अशोक चव्हाण यांचा भाजप प्रवेश

### कोणतीही जबाबदारी स्वीकारण्याचे दिले संकेत

**मुंबई-माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी मंगळवारी अखेर भाजपचे कमळ हाती घेतले. उपमुख्यमंत्री अशोक चव्हाण व भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत त्यांनी आपले सहकारी अमर राजूरकर यांच्यासह भाजपमध्ये प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी आजपासून आपल्या आयुष्याची खऱ्या अर्थाने नवी सुरुवात झाल्याची भावना व्यक्त केली. आजपासून मी एक नवी सुरुवात करत आहे. यापुढे मी भाजपच्या ध्येयधोरणांनुसार काम करेल. विशेषत: पक्षाचा आदेश व फडणवीस यांचे निर्देश यांच्यानुसार मी वाटचाल करेन, असे ते म्हणालेत.**



अशोक चव्हाण यांनी सोमवारी काँग्रेस पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्यानंतर मंगळवारी त्यांनी मुंबई स्थित भाजप कार्यालयात जाऊन केंद्रातील सत्ताधारी भगव्या पक्षात प्रवेश केला. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले. अशोक चव्हाण यांच्यासोबत त्यांचे सहकारी अमर राजूरकर यांनीही भाजपत प्रवेश केला आहे. या दोघांव्यतिरिक्त अन्य कुणीही भाजपचे कमळ हाती घेतले नाही. पण येत्या काही दिवसांत चव्हाण यांचे अनेक समर्थक भाजपत प्रवेश करतील असा दावा केला जात आहे.भाजप प्रवेशावेळी अशोक चव्हाण यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात काम करण्याची उपस्थितांना ग्वाही दिली. आज माझ्या ३८ वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत बदल झाला. मी आज अधिकृतपणे भाजपमध्ये प्रवेश केला. यापुढे मी मोदींची स्फूर्ती व प्रेरणा घेऊन काम करेल, असे ते म्हणाले.गेली तीन दशके काँग्रेस पक्षाच्या विस्तारासाठी काम करणारे, बालपणापासूनच काँग्रेसी विचारांनी प्रभावित असणारे राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी आज भाजपमध्ये प्रवेश केला. काँग्रेस पक्षाचा हात सोडत अशोक चव्हाण यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत अशोक चव्हाण यांचा पक्षप्रवेश झाला.




## पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीत सुधारणा करण्या साठी समिती नेमणार-कृषीमंत्री मुंडे

**मुंबई**-पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीमध्ये सुधारणा करण्यासाठी तसेच इतर पर्यायांचा विचार करण्यासाठी समिती नियुक्त करण्याचा निर्णय कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

राज्यातील पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीमधील अडीअडचणी दूर करून ही योजना अधिक प्रभावी पद्धतीने राबवण्याकरिता अथवा शेतकऱ्यांना थेट लाभ मिळवून देणाऱ्या अन्य पर्यायांचा विचार करण्यासाठी कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या दालनात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला कृषीविभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार, कृषीआयुक्त प्रवीण गेडाम तसेच कृषी विभागातील इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.बैठकीच्या सुरुवातीला चालू हंगामातील पिकविम्याचा आढावा घेण्यात आला. तसेच आधार लिंक अथवा इतर कारणांमुळे पिकविमापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांच्या नावांच्या याद्या ग्रामपंचायत कार्यालयांच्या बाहेर लावण्याची सूचना कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी केली.चालूवर्षी शासनाने पीक विम्यासाठी भरघोस तरतूद केली. सन २०१६ नंतर सर्वात जास्त पीक विम्याचा लाभ चालू वर्षी शेतकऱ्यांना मिळवून दिला. तथापि, याबाबत वारंवार लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांकडून तक्रारी प्राप्त होत असल्याने पिकविम्याच्या अंमलबजावणीतील त्रुटी दूर कराव्यात किंवा काही राज्यांनी शेतकऱ्यांना थेट लाभ मिळवून देणाऱ्या अन्य पर्यायांचा विचार केला असून त्याची कार्यपद्धती, योजना व अंमलबजावणी यांचा अभ्यास करून शासनास शिफारस करण्यासाठी समिती गठित करावी असे आदेश कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी यावेळी दिले. या समितीची कार्यकक्षा व रचना याबाबत वेगळ्या सूचना निर्गमित करण्याचे सुद्धा निर्देश यावेळी कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले. सदर समिती एक महिन्याच्या आत शासनास अहवाल सादर करणार आहे.

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून रुग्णांना आधुनिक वैद्यकीय सुविधा



### मुल येथे महाआरोग्य शिबिर ; ३१२७ रुग्णांची नोंद

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

नागरिकांना अत्यंत माफक दरांमध्ये अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे काळाची गरज आहे. कोविड महासाथीच्या काळात आरोग्य यंत्रणेचे महत्त्व संपूर्ण जगाला कळले. त्यामुळे गरीबांना परवडतील अशा माफक दरात आरोग्य सुविधा पुरविणे हे आद्य कर्तव्य असल्याची जाण ठेवत राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून मूल येथे हजारो नागरिकांची निःशुल्क आरोग्य तपासणी करण्यात आली.सुधीर मुनगंटीवार तथा वर्धा येथील दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मुल येथे महाआरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिरात ३१२७ रुग्णांची नोंदणी करण्यात आली. त्यानंतर कर्मवीर महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. तपासणीदरम्यान पुढील वैद्यकीय उपचारांची गरज असलेल्या १३०७ रुग्णांना वर्धा येथील दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्थेच्या इस्पितळात दाखल करण्यात येणार आहे.मुल येथील कर्मवीर महाविद्यालयात आयोजित महाआरोग्य शिबिरासाठी दत्ता मेघे आयुर्विज्ञान संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. अभ्युदय मेघे यांनी सहकार्य केले. मंत्री श्री. मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून घेण्यात आलेल्या या शिबिरात तपासणीनंतर उपचारांची गरज असलेल्या रुग्णांवर सावंगी मेघे येथील रुग्णालयात विनामूल्य उपचार करण्यात येणार आहे. मुल ते सावंगी मेघे येथे जाण्यासाठी रुग्णांना मोफत वाहन व्यवस्थाही उपलब्ध करून देण्यात येणार असून योग्यवेळी वैद्यकीय तपासणी व पुढील उपचाराबद्दल अनेक रुग्णांनी यावेळी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे आभार व्यक्त केले.

## सायबर गुन्ह्याच्या जनजागृतीसाठी सायबर जागृती यात्रा

### शहरातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

विदर्भातील शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि विद्यार्थिनी, तरुण वर्गामध्ये सायबर गुन्ह्याबाबत जनजागृती करण्यासाठी सायबर जागृती यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

सायबर गुन्ह्याबाबत माहिती उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र सायबरचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या मार्गदर्शनात, सायबर जागृती यात्रेचे मुख्य संशोधक तथा सहाय्यक प्राध्यापक आणि स्थानांतर संरचनेचे निर्देशक डॉ. नवीन मुकेश पंजाबी यांच्या अध्यक्षतेमध्ये सायबर जागृती यात्रेचे आयोजन करण्यात आले. सदर पथक संशोधन व जागरूकता उपक्रमांतर्गत लघु संशोधन प्रकल्पाकरीता माहिती संकलित करण्यासाठी मणिभवन गांधी संग्रहालय, मुंबई येथून दि. ७ फेब्रुवारी रोजी सायबर



जागृती यात्रेची सुरुवात करणार आहे. सदर सायबर जागृती यात्रा वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, नागपूर, यवतमाळ, अकोला, वाशिम आणि बुलढाणा अशा ११ जिल्ह्यांना भेटी देऊन १७ फेब्रुवारी २०२४ रोजी समारोप करणार आहे.सायबर जागृती यात्रेचे मुख्य संशोधक डॉ. नवीन पंजाबी संशोधक विद्यार्थ्यांच्या पथकासह चंद्रपूर येथे आल्याने पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक रीना जनबंधू यांच्या मार्गदर्शनात सायबर पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक रोशन यादव यांच्या नेतृत्वात शहरातील सरदार पटेल महाविद्यालय, जनता महाविद्यालय चंद्रपूर तसेच श्री.ज्ञानेश विद्यालय तथा महाविद्यालय,नवरगाव या ठिकाणी जाऊन शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे व त्यास प्रतिबंध करण्याच्या उपाययोजनेसंदर्भात माहिती देण्यात आली. त्यासोबतच, मोबाईल तंत्रज्ञानाचा जपून वापर करणे, आर्थिक फसवणूक झाल्यास सायबर हेल्पलाइन १९३० डायल करणे, सायबर गुन्ह्यासाठी cybercrime. gov.in या संकेतस्थळावर तसेच मोबाईल हरवल्यास ceir. gov.in या संकेतस्थळावर कळवावे आदी सायबर गुन्हे सुरक्षिततेच्या उपाययोजनेबाबत माहिती देऊन जनजागृती करण्यात आली.यावेळी सरदार पटेल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रमोद काटकर, जनता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. सुभाष, तसेच ज्ञानेश विद्यालय तथा महाविद्यालय चे प्राचार्य डॉ. सुरेश बाकरे आदी उपस्थित होते.

## तुळजापूर रेल्वे स्टेशनला मेल गाड्यांचा थांब्या करिता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची घेतली भेट

**वर्धा । प्रतिनिधी**

तुळजापूर रेल्वे स्टेशन परिसरातील २५ गावाच्या विद्यार्थी यांचा रेल्वे मेल गाड्यांचा थांबाचा प्रश्न सुटावा या मागणीसाठी केंद्रीय सडक परिवहन मंत्री नितीन गडकरी यांची तुळजापूर येथे सुरू असलेल्या बेमुदत साखळी उपोषणाला दिनांक ०९ फेब्रुवारी २०२४ ला माजी आमदार प्रा.राजु तिमांडे व अनिल जवादे यांनी आंदोलन स्थळी भेट दिली व त्यांच्याशी चर्चा केली व मागणी लक्षात घेत पाठिंबा जाहीर केला.त्यावेळी उपस्थित आशिष इंझनकर,ड.अरूण येवले,अरुण गावंडे, संदीप वाणी सरपंच, आतिश घूडे,मंगेश काकडे ,सुनील जयस्वाल ,राकेश उंरकांदे भालेराव अडे ,स्वप्निल ठाकूर अजय राजूरकर,राहुल बैस,श्रीराम पाटील,रमेश साळवे गजानन तिडके, भूषण कावळे आदी उपस्थित होते.



## परीक्षेतील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी जिल्ह्यात ८ भरारी पथके

### जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला दक्षता समितीचा आढावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) परीक्षा २१ फेब्रुवारी ते १९ मार्च २०२४ तर माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १०) परीक्षा १ मार्च ते २६ मार्च २०२४ या कालावधीत होणार आहे. सदर परीक्षा तणावमुक्त वातावरणात होण्यासाठी तसेच परीक्षेतील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी जिल्ह्यात एकूण ८ भरारी पथके स्थापन करण्यात आली आहे. याबाबत जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी जिल्हास्तरीय दक्षता समितीचा आढावा घेतला.

वीस कलमी सभागृह (जिल्हाधिकारी कार्यालय) येथे आयोजित या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलिस अधिक्षक रिना जनबंधू, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, शिक्षणाधिकारी (माध्य.) कल्पना चव्हाण, शिक्षणाधिकारी (प्राथ.) राजकुमार हिवारे, विस्तार अधिकारी (शिक्षण) सावन चालखुरे आदी उपस्थित होते.यावेळी जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले,



परिक्षेच्या काळात जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय अधिका-यांनी परीक्षा केंद्रांना भेटी द्याव्यात. तसेच संवेदनशील परीक्षा केंद्रावर जास्त बंदोबस्त ठेवावा. परिक्षेच्या पहिल्या दिवसापासूनच गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी शिक्षण विभाग तसेच पोलिस विभागाने सुक्ष्म नियोजन करावे. महत्वाचे तसेच इतर पेपरवेळी भरारी पथकांनी परीक्षा केंद्रांना भेटी देऊन तपासणी करावी, अशा सुचना जिल्हाधिका-यांनी केल्या.असे आहेत भरारी पथक : परिक्षेतील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी जिल्ह्यात स्थापन करण्यात आलेल्या भरारी पथकामध्ये शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचे भरारी पथक, शिक्षणाधिकारी (योजना) यांचे पथक, शिक्षणाधिकारी (प्राथ), उपशिक्षणाधिकारी (माध्य.), महिला अधिकारी वर्ग - १ यांचे पथक, तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य यांचे विशेष भरारी पथक, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे ज्येष्ठ अधिष्ठाता यांचे विशेष भरारी पथक आणि नागपूर येथील प्रादेशिक विद्या प्राधिकरण उपसंचालक यांच्या कार्यालयातील वर्ग १ व २ चे विशेष भरारी पथक यांचा समावेश आहे.जिल्ह्यातील परीक्षा केंद्र व विद्यार्थ्यांची संख्या : इयत्ता १२ वी करीता जिल्ह्यात एकूण ८६ परीक्षा केंद्र असून एकूण विद्यार्थी संख्या २८७३३ आहे. तर इयत्ता १० वी करीता परीक्षा केंद्रांची संख्या १२४ आणि विद्यार्थी संख्या २८२६६ आहे.जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय दक्षता समिती : जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय दक्षता समिती स्थापन करण्यात आली असून इतर सदस्यांमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलिस अधिक्षक, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथ.) शिक्षणाधिकारी (योजना) यांचा समावेश आहे. तर शिक्षणाधिकारी (माध्य.) हे समितीचे सदस्य सचिव आहेत.तालुकास्तरीय दक्षता समितीचे अध्यक्ष उपविभागीय अधिकारी असून इतर सदस्यांमध्ये तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, संबंधित पोलिस निरीक्षक असून गटशिक्षणाधिकारी हे सदस्य सचिव आहेत.

# सांगली शाळा शिक्षिका: संजीवनी मराठे!

**संजीवनीजींच्या बालगीतांचा स्वतंत्र उल्लेख व स्तुती करणे आवश्यक आहे. मुलांचे अनुभवविश्व साकार करण्याचे श्रेय त्यांनी प्रौढ जाणिवेचे वा भाषेचे वजन येऊ न देता अस्सलपणे मिळविले. महाराष्ट्र शासनाने 'बरं का ग आई' व 'हसू बाई हसू' या त्यांच्या बालगीत संग्रहांना प्रथम पुरस्कार देऊन त्यांचा उचित गौरव केला. त्यांच्या जयंतीनिमित्त श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींचा हा ज्ञानवर्धक लेख वाचकांच्या सेवेत. संपादक**

संजीवनी रामचंद्र मराठे या विशेषकरून गीतरचना व सुस्वर काव्यगायन यांसाठी मान्यता पावलेल्या एक आधुनिक मराठी कवयित्री. संजीवनीजींचा जन्म दि.१४ फेब्रुवारी १९१६ रोजी महाराष्ट्रातील पुणे या शहरात झाला. त्यांचे शिक्षण पुण्यात झाले. शाळकरी वयातच त्यांनी कविता करावयास सुरुवात केली. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या त्या जीए- गृहीतागमा व एमए होत्या. आयुष्याच्या उत्तरार्धात त्या आणि त्यांचे पती खानापूर-बेळगाव सोडून सांगलीस गेले. सांगलीत राम मंदिराजवळच त्यांचा रामकृपा नावाचा बंगला होता. त्यांनी काही दिवस सांगलीच्या शाळेत शिक्षिकेचे काम केले. त्यांना मिना, भारती, अंजू या तीन मुली आणि प्रताप नावाचा मुलगा होता. प्रताप हा वैमानिक होता. अंजूने लग्नानंतर पाठविलेली पत्रे संजीवनीजींनी संपादित करून प्रकाशित केली. त्यांच्या रचनांचा सन १९३२मधील काव्य-संजीवनी हा त्यांचा पहिला संग्रह असला, तरी त्यांची रसिकांना खरी ओळख झाली ती राका या संग्रहातून- काव्य-संजीवनीतील निवडक रचनाही त्यात पुनर्मुद्रीत केलेल्या आहेत.

संजीवनीजींनी काव्यलेखनास प्रारंभ केला तो काळ तांबे व रविकिरण मंडळ यांच्या प्रभावाचा होता. साहजिकच तांबे यांच्या गीतशैलीची सार्वत्रिक मोहिनी आणि रविकिरण मंडळाने निर्माण केलेल्या काव्यगायनास अनुकूल असे वातावरण यांच्या संस्कारांतून त्यांची कविता गेय रूपात अवतरली. त्यांच्या गोड गळ्याची तिला उत्तम जोड मिळाली. रवींद्रनाथ टागोरांच्या काव्याची मोहिनीही त्यांच्यावर होती. तांबे यांची जीवनसृष्टी, सौंदर्यशक्ती, तसेच शब्दकला, आविष्कराचे वळण यांचा संजीवनीजींच्या कवितेवरील संस्कार स्पष्ट आहे. तसेच मनोरमा रानडे यांच्या काव्यातून आधुनिक सुशिक्षित, सुसंस्कृत स्त्रीमनाचा विशेषत: तिच्या प्रणयभावनेचा, जो एक सहजमोकळा आविष्कार घडण्यास प्रारंभ झाला होता. त्याची परंपराही त्यांच्या कवितेत पृथगामी स्वरूपात प्रवाहित झालेली दिसते. प्रणयानुभवातील तरल स्पंदने, त्याची स्वप्निलता, अलौकिकता व्यक्त करणारी त्यांची कविता अस्सलपणामुळे व वेगळेपणामुळे विशेष मनोवेधक ठरली. 'शांत सागरी कशास उठविलीस वादळे?' हे गीत याचे उत्कृष्ट



प्रातिनिधिक उदाहरण होय.त्यानंतरच्या त्यांच्या कविता संसार, छाया, चित्रा व चंद्रफूल या कवितासंग्रहांतून प्रकाशित झाल्या. भावपुष्प व परिमला हे त्यांचे गीतसंग्रह होत. संजीवनी हा त्यांच्या निवडक कवितांचा संपादित संग्रह होय. तसेच काही बालगीतसंग्रह व लाडकी लेक ही अनुवादित बालकादंबरिका यांचाही त्यांच्या साहित्यसेवेत समावेश होतो. स्वप्नाळू प्रणयिनीचे व संसारी गृहिणीचे भावविश्व चित्रित करणारी त्यांची कविता प्राधान्याने स्वत:तच केंद्रित झाली आहे. आपल्या भाविश्वाचे भान विसरून स्वत:पलीकडच्या एखाद्या अनुभवाशी एकरूप झाल्याची 'एक सानशी कळशी' सारखी उदाहरणे मोजकी आहेत. आत्मप्रतीतीच्या परिघाबाहेर गेले, की त्यांची कविता सांकेतिक व क्षीण होते. हा राष्ट्रप्रेमाचा आविष्कार त्यांच्या रचनेतून स्पष्ट होतो.

संजीवनी मराठेंच्या काव्यातून प्रीतीच्या पृथगात्म चित्रणाच्या बरोबरीने सौंदर्यपूजक वृत्ती, सश्रद्धा, वात्सल्यादि स्त्रीसुलभ भाव इत्यादींचा आविष्कारही आढळतो. त्यांचे अनुभवविश्व तसे साधे, व्यापक व व्यामिश्रता या दृष्टीने मर्यादित असले तरी या कवयित्रीने आत्मप्रत्ययाशी व स्वत:च्या काव्यप्रकृतीशी प्रामाणिक राहून निर्मितीतील स्वत्व जपले, हे महत्त्वाचे! त्यांच्या अनुभवविश्वाला असलेला निरागसतेचा रंग हे त्याचे एक वेधक वैशिष्ट्य आहे. त्यांच्या पुढील काळातील रचनांवर मराठी काव्यातील नवीन प्रवाह, स्थित्यंतरे यांचे बाह्य संस्कार झालेले दिसतात. यातून अनुभवातील अंतर्मुखता तसेच रचनेतील साक्षेप व संयम वाढलेला दिसला, तरी त्या कवितेचा गाभा तोच राहिला आहे. संजीवनीजींच्या बालगीतांचा स्वतंत्र उल्लेख व स्तुती करणे आवश्यक आहे. मुलांचे अनुभवविश्व साकार करण्याचे श्रेय त्यांनी प्रौढ जाणिवेचे वा भाषेचे वजन येऊ न देता अस्सलपणे मिळविले. महाराष्ट्र शासनाने 'बरं का ग आई' व 'हसू बाई हसू' या त्यांच्या बालगीत संग्रहांना प्रथम पुरस्कार देऊन त्यांचा उचित गौरव केला.

संजीवनी मराठे यांचे महाराष्ट्रातील विद्येचे माहेरघर समजल्या जाणारे पुणे येथे दि.१ एप्रिल २००० रोजी निधन झाले.

!! जयंती निमित्त त्यांना विनम्र अभिवादन !!

**संकलन व लेखन**
**श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली**
**फक्त व्हॉ. नं. ९४२३७१४८८३.**

## मुल येथे महाआरोग्य शिबिर ३१२७ रुग्णांची नोंद

### १३०७ रुग्णांवर मेघे रुग्णालयात होणार विनामूल्य उपचार



**मूल । प्रतिनिधी**

नागरिकांना अत्यंत माफक दरांमध्ये अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे काळाची गरज आहे. कोविड महासाथीच्या काळात आरोग्य यंत्रणेचे महत्त्व संपूर्ण जगाला कळले. अशात गरीबांना परवडतील अशा माफक दरात आरोग्य सुविधा पुरविणे हे आद्य कर्तव्य असल्याची जाण ठेवत राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून मूल येथे हजारो नागरिकांची निःशुल्क आरोग्य तपासणी करण्यात आली.

ना.सुधीर मुनगंटीवार तथा वर्धा येथील दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मुल येथे महाआरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात ३ हजार १२७ रुग्णांची नोंदणी करण्यात आली. त्यानंतर कर्मवीर महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. तपासणीदरम्यान पुढील वैद्यकीय उपचारांची गरज असलेल्या १ हजार ३०७ रुग्णांना वर्धा येथील दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्थेच्या इस्पितळात दाखल करण्यात येणार आहे. मुल येथील कर्मवीर महाविद्यालयात आयोजित महाआरोग्य शिबिरासाठी दत्ता मेघे आयुर्विज्ञान संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी डॉ.अभ्युदय मेघे यांनी सहकार्य केले.ना.मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून घेण्यात आलेल्या या शिबिरात तपासणीनंतर उपचारांची गरज असलेल्या रुग्णांवर सावंगी मेघे येथील रुग्णालयात विनामूल्य उपचार करण्यात येणार आहे. मुल ते सावंगी मेघे येथे जाण्यासाठी रुग्णांना मोफत वाहन व्यवस्थाही उपलब्ध करून देण्यात येणार असून योग्यवेळी वैद्यकीय तपासणी व पुढील उपचाराबद्दल अनेक रुग्णांनी यावेळी ना. मुनगंटीवार यांचे आभार व्यक्त केले.

## दिव्यांग सेवा संघर्ष जन परिसर संघटनेची सभा संपन्न

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

दिव्यांग सेवा संघर्ष जनपरिसर संघटना मिंडाळाची मासिक सभा मंगळवार दिनांक १३ फेब्रुवारीला या परिसरातील प्रसिध्द देवस्थान किटाळीचा मारुती येथे पार पडली.

मारुती देवस्थान परिसरात पार पडलेल्या सभेत पाच टक्के दिव्यांग कल्याण निधी, दिव्यांगा ना अंत्योदय योजनेतील प्राधान्य, समाजकल्याण योजना, बालसंगोपन योजनाआदी विविध योजनाची माहिती देण्यात आली. आम्ही आमच्या आरोग्यासाठी संस्था कुरखेडाचे तालुका समन्वयक नितेश नागपुरे, स्वयंसेविका अनिता बावणकर यांनी वेगवेगळ्या योजनाची माहिती दिली. या संस्थेच्या माध्यमातून दिव्यांगाना शेळी पालन,शिलाई मशीन, सायकल स्टोर्स,



भाजीपाला, लोखंड व्यवसाय आदी व अशा अनेक लघुव्यवसायचे प्रशिक्षण एरंडी तालुका कुरखेडा इथे दिले जात असून दहा हजार रुपये बिनव्याजी कर्ज दिले जात आहे. याचा लाभ अनेकांनी घेतला असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.या सभेत मिंडाळा किटाळी मेंढा, नवेगाव हुंडेश्वरी मींथुर, राजोली, बोन्ड येथील अनेक दिव्यांग बांधव उपस्थित होते.दिव्यांग सेवा संघर्ष संघटनेचे सचिव देविदास कन्नाके यांचेकडून भोजनदान करण्यात आले.उपस्थित सर्वांनी निसर्गरम्य वातावरणात पार पडलेल्या बैठकीत समाधान व्यक्त केले.

## क्रीडा भारती अंबाजोगाईची कार्यकारिणी घोषित

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

क्रीडा भारती अंबाजोगाई तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून तालुका अध्यक्षपदी शैलेश कुलकर्णी तर मंत्रीपदी ज्ञानेश मातेकर यांची निवड करण्यात आली.

क्रीडा भारतीचे देवगिरी प्रांत मंत्री भिकाजी बारसे यांच्या प्रमुख उपस्थितीत नुतन कार्यकारी निवडण्यात आली.त्यात तालुका अध्यक्षपदी शैलेश कुलकर्णी, तालुका मंत्री ज्ञानेश मातेकर, उपाध्यक्ष सौ.मंदाकिनी गित्ते,प्रा.दिलीप कांबळे,सहमंत्री संजय वाकडे,योग प्रमुख प्रा.दिपक देवळे, सहप्रमुख उत्रेश्वर पांचाळ गुरुजी,युवा प्रतिनिधी बालाजी कराड,युवती प्रमुख कु.साक्षी थाटकर, क्रीडा केंद्र प्रमुख शारदा प्रसाद साहू सर, मनोज



देशमुख सर,मातृशक्ती प्रमुख डॉ.रिता रामावत.तर जिल्हा योग सहप्रमुख प्राचार्य डॉ.दामोदर थोरात सर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.याप्रसंगी बोलतांना प्रांत मंत्री भिकाजी बारसे म्हणाले की, स्वदेशी खेळांच्या प्रसार होणे आवश्यक आहे.क्रीडा भारती च्या माध्यमातून शालेय व महाविद्यालयीन खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.मोबाईल व टि.व्ही च्या अती वापरामुळे तरुणाई मैदानापासून दुरावत चालली आहे.पालकांनी सुध्दा याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.जिल्हा मंत्री विनायक वझे म्हणाले की, आगामी काळात क्रीडा भारतीचे जिल्हा संमेलन होणार आहेत.योग प्रसार हा काळाची गरज आहे.रथसप्तमी निमित्ताने तालुक्यातील सर्व शाळा व महाविद्यालातुन सूर्यनमस्कार प्रात्यक्षिके आयोजित करण्यात यावीत. असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शैलेश कुलकर्णी, सुत्रसंचलन, ज्ञानेश मातेकर, आभार प्रदर्शन सौ.मंदाकिनी गित्ते यांनी केले. याप्रसंगी बिपिन दादा क्षिरसागर, राकेश मोरे, भास्कर थाटकर,सह क्रीडा भारतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## चिमूर तालुका कॉंग्रेस कमिटीची बैठक संपन्न



**चिमूर । प्रतिनिधी**


तालुका कॉंग्रेस कमिटी चिमूर अध्यक्ष डॉ. विजयगावंडे पाटील यांच्या अध्यक्ष खाली १३ फेब्रुवारी रोज मंगळवारला चिमूर तालुका कॉंग्रेस कमिटीची बैठक कॉंग्रेस कमिटी कार्यालय चिमूर येथे पार पडली .

राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबोसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश तथा समन्व्यक चिमूर विधानसभा डॉ. सतिश वारजुकर, ओबीसी संघटक धनराज मुंगले, चंद्रपूर जिल्हा सरचिटणीस गजानन बुटके यांच्या उपस्थित पार पडलेल्या या सभेमध्ये १९ फेब्रुवारीला छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्सव साजरी करण्याबाबत विचार विनिमय करण्यात आला.तालुका कॉंग्रेस कमिटीच्या कार्यकारणीची चर्चा केली सर्व जिल्हा परिषद सर्कलचा आढावा घेण्यात आला.व्हिव्हीपॅट व वोटिंग मशीन बाबत जनजागृती करणेबाबत चर्चा करण्यात आली . या वेळी सेवादल तालुका अध्यक्ष किशोर शिंगरे, शहर अध्यक्ष अविनाश अगडे, सचिव विजयजी डाबरे, तालुका अध्यक्ष पर्यावरन प्रदीप तर्वेकर, माजी सभापती शांताराम सेलवटकर, उपाध्यक्ष राजू चौधरी, उपाध्यक्ष राजू लोणारे, उपाध्यक्ष रहेमान पठाण, शहर अध्यक्ष भिसी विजय मेहर, सुधीर पोहीणकर,अध्यक्ष अल्पसंख्यांक आशिप शेख, ड.वंजारी, बबन कुबडे, मीडिया प्रमुख पप्पू शेख, नामदेव डोये, प्रमोद दाभेकर, नितीन कटारे, रामदास चौधरी, संजय राऊत, घनश्याम रामटेके, सुभाष करारे, लहुजी सूर्यवंशी, अमित कसारे, अशोक दूधनकर, अक्षय लांजेवार, लोकेश रामटेके, अमित मेश्राम, गणेश दहिकर, मुरलीधर निमजे, सुधीर कोसरे, मधुजी मुंगले, रोहन नन्नावरे, जाबीर कुरेशी, निरंजन उरकुडे, गोवर्धन कुबडे, अमोल शिवरकर,रत्नाकर विटाळे, दिपक ठोंबरे, दिवाकर मेश्राम, अक्षय सोनटक्के, प्रदीप तिकट, यावेळी बंडू हिवरकर यांची खडसंगी - मुरपार सर्कल निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

# बहुजनांचे आधारवड

# प्रा.डॉ.बबनराव तायवाडे

युग धर्मानुसार काळाचे चक्र अव्याहत फिरत असते त्यानुसारच त्याची दिशा देखील ठरत जाते काळाबरोबर प्रवाहित होणारा जीवन प्रवाह देखील शाश्वत मूल्यांना धरूनच वाहत असतो. नदीच्या उगमापासून तर तिच्या सागराला मिळण्यापर्यंतच्या प्रवासात अनेक स्थित्यंतरे घडत असली तरी नदी बदलत नाही. त्याप्रमाणे धेय्यनिष्ठ जीवन देखील सगळी परिवर्तन होत राहिली तरी ती परिवर्तने सामावून घेत शाश्वत राहते. त्याचे हे रहस्य ज्यांना आकळते ते परिस्थितीवर मात करून यशोशिखरे गाठतात. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा मोगरा सदैव दरवळत असतो. अशी माणसं व्यक्तीच्या मनावर नकळत छाप सोडून जातात. त्यातली काही हृदयाशी संवाद साधून जातात तर काही व्यक्तींच्या हृदयात कायमचे घर करून बसतात आणि अशीच माणसं समाजाचे आदर्श ठरतात असा हा आदर्श निर्माण करण्यासाठी अनेक दिवसांची तपसाधना लागते. त्यासाठी आपल्या वैयक्तिक इच्छा आकांक्षांना तिलांजली द्यावी लागते. परिणामी चंदनाप्रमाणेची जावे लागते तेव्हाच तो सुगंध समाजमनात दरवळतांना गरजवंताला शितलता प्रदान करीत असतो. असाच अनेकांच्या जीवनात आशेचा किरण जागृत करून त्यांना जगण्याची उभारी देणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. बबनराव तायवाडे सर. त्यांचं व्यक्तिमत्त्वच लोभस आणि सर्वांना हवहवसं वाटणारं आहे कारण त्यांच्या आविर्भावात कमालीची नम्रता आहे तर संभाषणात प्रकांड पंडिताची विद्वत्ता आहे. कुठल्याही विषयाचे सखोल ज्ञान आत्मसात करून प्रसंगानुरूप त्याचा वापर करण्याची कला



डॉ.राजेंद्र वाटाणे
नागपूर
sahyandrinews@gmail.com

त्यांना ज्ञात असल्यामुळेच शिक्षण क्षेत्रातील असो विद्यापीठातील असो की समाजातील ओबीसींचे प्रश्न असो ते लिलया हाताळतात त्यामुळेच आज एक मोठा जनसागर त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभा आहे. उपकाराची परतफेड करणे हा त्यांचा स्वभावधर्म आहे. त्यामुळे उपकारकर्त्यांविषयी त्यांच्यात जो आदरभाव आहे तो कमालीचा म्हणावा लागेल. एखाद्याचं कल्याण करायचं तर ते 'या हाताचे त्या हाताला कळू नये' इतक्या सहजतेने करतात आणि एकदा तर ज्यांचं त्यांनी कल्याण केलं त्यांना देखील याची जाणीव नसते. कारण ते कुठल्याही केलेल्या कार्याची वाच्यता वा उहापोह करीत नाही. याची अनुभूती अनेकांना आलेली आहे. सरांनी आपला समाजसेवेचा यज्ञ प्रज्वलीत ठेवतानाच विद्यार्थी हिताकडे कुठलेही दुर्लक्ष होणार नाही याची देखील काळजी घेतली आहे 'विद्यार्थी आहेत तर आपण व संस्था आहे' त्यामुळे प्रत्येकाने आपल्या पेशाशी प्रामाणिक असावे असा त्यांचा कटाक्ष आहे.

विद्यार्थी दशेपासूनच सामाजिक बांधिलकीची जाण असणाऱ्या डॉ. तायवाडे सरांनी शैक्षणिक, सांस्कृतिक, सहकार, क्रीडा, राजकारण इत्यादी कितीतरी क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा आगळा वेगळा ठसा निर्माण केला आहे. त्यामुळे त्यांचे नाव आज महाराष्ट्रातच नव्हे तर समस्त भारत वर्षात आदराने घेतले जाते. कारण त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याला जो निस्वार्थतेचा परिमळ लाभला आहे तो त्यांना ध्येयपथापर्यंत नेण्यास साध्य झाला आहे. बहुजनांच्या कल्याणासाठी त्यांनी ओबीसींचे रणशिंग फुंकले. विद्यापीठातील न्याय हक्कासाठी त्यांनी केलेला अविरत संघर्ष सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील प्रत्येकाला ज्ञातच नाही तर त्यांनी हाती घेतलेल्या प्रत्येकच झंजावती कार्याचे आपण साक्षी आहोत. एखाद्या कार्याची खुणगाठ त्यांनी मनात बांधली की ते होतपर्यंत दिवस रात्र एक करून त्याला पूर्णत्वास नेतात. त्यामुळे त्यांना अष्टपैलू, ध्येयवादी, महामेरू, कुशल संघटन, संघर्षशील, प्रयत्नवादी, दीपस्तंभ, अजातशत्रु, भूमिपुत्र, समूहनायक अशा एक ना अनेक



उपाधींनी संबोधित केले जाते. परंतु या त्यांच्या केवळ उपाधी नाही तर त्या त्यांच्या निस्वार्थ व लोक कल्याणकारी कार्याची पावती आहे. वास्तविक पाहता तायवाडे सर हे अशा कुठल्याही एका उपाधीत सामावणारे नाहीत याची सगळ्यांनाच जाण आहे. त्यांचे संघटनकौशल्य इतके मजबूत आहे की एखाद्या राजकीय पुढाऱ्याला देखील ते शक्य होणार नाही. त्यांच्या नेतृत्वात संपन्न झालेल्या अनेक सभांना हजारोंच्या संख्येने विदर्भाच्या कानाकोपऱ्यातून आलेले त्यांचे चाहते आपण प्रत्यक्ष बघितले आहेत.

डॉ. तायवाडे सरांचा जन्म १४ फेब्रुवारी १९५६ रोजी नागपूर जवळ असलेल्या बेलतरोडी या गावी श्री. भाऊरावजी व सौ. लीलाबाई या दांपत्याच्या पोटी सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. ग्रामीण जीवन तेथील संस्कृती, रुढी -परंपरा , आचार-विचार यासर्वांचा नकळत प्रभाव त्यांच्यावर होता. एकीकडे शिक्षणाविषयी आवड तर दुसरीकडे घरातील गरीबी, त्यामुळे बालवयातच त्यांना विविध आव्हानांचा सामना करावा लागला. परंतु अशा विपरीत परिस्थितीत देखील त्यांनी स्वतः कष्ट करून प्रसंगी छोटी-मोठी नोकरी करून आपले शिक्षण पूर्ण केले. त्यांच्यातील संघटन कौशल्य विद्यार्थी दशेपासूनच झळाळत होते. बारावीला असताना ते स्टुडंट्स कौन्सिलचे सचिव झाले. तर एम. कॉम.ला धनवटे नॅशनल कॉलेज मध्ये जनरल सेक्रेटरी असतानाच्या काळात डॉ. म. ग. बोकरे यांनी कापूस भाववाढीबद्दल जे आंदोलन उभारले होते तेव्हा डॉ. तायवाडे सरांनी स्वतः त्यात सहभागी होऊन विद्यार्थी मित्रांना आपण शेतकऱ्यांच्या उत्थानासाठी कार्य करणे कसे गरजेचे आहे याची जाणीव करून दिली. पुढे प्राध्यापकांच्या हितासाठी व त्यांच्या न्याय्यमागण्यांना वाचा फोडण्यासाठी 'यंग टीचर्स असोसिएशन' ही प्राध्यापकांची संघटना उभी करून नेट-सेट ग्रस्त प्राध्यापकांच्या प्रश्नापासून तर विनाअनुदानीत प्राध्यापकांच्या प्रश्नांना मार्गी लावण्यासाठी प्रसंगी उपोषण देखील केले. ग्रामीण विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या शिक्षणविषयक सवलती, जाचक अटी व नोकरीच्या संधी यासाठी त्यांनी सातत्याने आंदोलने केली. याशिवाय सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, क्रीडा इत्यादी विविध क्षेत्रातील कार्य त्यांनी सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेने पूर्ण केले. याचप्रमाणे मंडल आयोगाचे आंदोलन, ओबीसींना शिष्यवृत्ती, क्रीमीलेअरची मर्यादा वाढविणे, ओबीसी आरक्षण कायम राहण्यासाठी प्रयत्न हे त्यांच्या समाज निष्ठतेची साक्ष देणारे आहे. आज ते ओबीसींचे राष्ट्रीय नेते असताना त्यांची ओबीसींच्या हक्कासाठी असणारी धडपड सर्वांनाच ज्ञात आहे. मनुष्याने दृढनिश्चय केला तर प्रत्येक गोष्ट त्याला साध्य करता येते यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. लोककल्याणाचे कार्य करताना फळाची अपेक्षा न ठेवता निरपेक्ष भावनेने काम करणे हा त्यांचा उद्देश आहे. ज्या धनवटे नॅशनल कॉलेज मध्ये त्यांनी शिक्षण घेतले त्याच महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून ते रूजू झाले व तेथूनच प्राचार्य पदावरून निवृत्त देखील झाले. आपल्या कार्यकाळात महाविद्यालयाचा आलेख त्यांनी सातत्याने उंचावत ठेवला. डॉ. तायवाडे सर हे छत्रपती शिवाजी महाराज, राजश्री शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वैराग्यमूर्ती गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा वैचारिक वारसा जोपासणारे असल्यामुळे जिथे विकासाचा प्रश्न आला मग तो शैक्षणिक असो की सामाजिक असो त्यांनी सदैव रचनात्मक सहकार्याची भूमिका घेतलेली आहे. सर्वांना सोबत घेऊन काम करणे हे त्यांच्या स्वभावाचे खास वैशिष्ट्य आहे. त्यामुळेच सर्वच राजकीय पक्षातील कार्यकर्ते व पुढा-यांशी त्यांचे स्नेहाचे संबंध आहे. सेवाभाव हा तर सरांचा स्वभावधर्मच आहे. त्यांनी निस्वार्थ भावनेने आणि लोककल्याणाच्या हेतूने सर्वच क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. त्याचीच फलश्रुती 'बहुजनांचे आधारवड : डॉ. बबनराव तायवाडे ' हा त्यांच्या अफाट व निरंतर कार्याचा वेध घेणारा गौरव आहे. या ग्रंथातून सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक ,पत्रकारिता व स्नेहीजनांनी त्यांच्या कार्याची घेतलेली दखल जशी त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देणारी आहे. तशीच विपरीत परिस्थितीतही मनुष्याला जगण्याची उर्जा प्रदान करणारी आहे. सरांच्या वाढदिवसा निमित्ताने त्यांना निरामय आरोग्य आणि उदंड आयुष्य लाभो हीच प्रार्थना!

# नवीन शैक्षणिक धोरणामुळे मक्तेदारी मोडीत निघाली- किरणकुमार गित्ते

## अहमदपूर येथील पोतदार जम्बो किड्सच्या स्नेहसंमेलनाने लक्ष वेधले

**परळी । प्रतिनिधी**

येथे पोतदार जम्बो किडस्ची पहिले वार्षिक स्नेहसंमेलन शनिवार दि. १० फेब्रुवारी रोजी अहमदपूर येथे शाळेच्या विस्तीर्ण हिरवळीवर पार पाडले. लहान चिमुकल्यांच्या नृत्य अविष्काराने वातावरण पूर्णतः बदलून गेले पहिलेच वार्षिक स्नेहसंमेलन असल्याने पालकवर्गाने मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला आणि तेवढ्या उंचीची तयारी व्यवस्थापनाने केली होती. नवीन शैक्षणिक धोरणामुळे आता ठराविक लोकांची मक्तेदारी मोडीत निघाली आहे शिवाय नव्या धोरणामुळे चांगले शिक्षण आणि मनाला वाटेल ते शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या बाबतीत पालकांनी सजग होवून आपल्या मुलांमध्ये वेळ घालविण्याची गरज असल्याचे मत त्रिपूरा राज्याचे नगरविकास व अर्थ वाणिज्य आरोग्य आणि कुटूंब विकास विभागाचे सचिव किरणकुमार गित्ते यांनी व्यक्त केले.






यावेळी प्रमुख अतिथी म्हणून किरणकुमार गित्ते साहेब सचिव त्रिपुरा सरकार, सौ उषाताई किरण गित्ते अध्यक्षा विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटी, अहमदपूर तहसिलदार शिवाजी पल्लेपाड, पुणे येथील पिआयएसचे प्राचार्य ए.के.सिंग, तसेच पी आय एस अंबाजोगाईचे प्राचार्य किर्तीकुमार देशमुख, संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत गित्ते व मान्यवर उपस्थित होते. यावेळी लहान चिमुकल्यांनी वेगवेगळे कला प्रकार सादर करुन उपस्थितांची लक्षवेधले पहिले वार्षिक स्नेह संमेलन असल्याने अनेकांना याची उत्सुकता होती. परंतु शालेय व्यवस्थापनाने आणि संस्थेच्या वतीने उत्कृष्ट असे नियोजन करण्यात आले ज्यामुळे पहिले वार्षिक स्नेहसंमेलन उपस्थितांच्या लक्षात राहण्यासारखे झाले. उत्कृष्ट अशी व्यवस्था करण्यात आली ज्यामुळे सर्व कलाप्रकार हे वेगवेगळ्या माध्यमांतून पालकांना जवळून पाहता आले. यावेळी किरणकुमार गित्ते साहेब सचिव त्रिपुरा सरकार म्हणाले की, आम्ही ज्या ग्रामीण भागातून आलो आहोत त्याठिकाणी पुरेशी सुविधा उपलब्ध नव्हती शिवाय तसे वातावरण नव्हते कुटूंबात शेती हा व्यवसाय असल्याने वडिल शेतकरी होते परंतु त्यांच्याकडे शिक्षणाविषयी गोडी आणि दृष्टी होती म्हणून त्यांनी मला चांगले शिक्षण देण्यासाठी प्रयत्न केले. आजच्या मुलांना सर्व सुविधा उपलब्ध आहेत वेगवेगळे शिक्षण मिळण्याची संधी उपलब्ध झाली आहे पूर्वीसारखे वातावरण आज नक्कीच नाही कमालीचा बदल झाला आहे. शैक्षणिक धोरणात बदल झाला आहे परिस्थिती बदललेली आहे त्यामुळे मुलांनीसुद्धा चांगले शिक्षण घेण्याची गरज आहे शिक्षणक्षेत्रातील मुक्तेदारी मोडीत निघाली आहे आता कुणीही आणि कुठल्याही क्षेत्रात प्रवेश करु लागला आहे इंटरनेट, ऑनलाइन शिक्षण मिळण्याची संधी निर्माण झाली आहे त्यामुळे पाश्चमात्य राष्ट्रातील शिक्षणसुद्धा आपल्याला ऑनलाइनपद्धतीने घेता येवू लागले आहे आपण सर्व ग्रामीण भागातील मुलं असल्याने आपल्याकडे इच्छाशक्तीअ असेल तरपुढे जावू शकतोत कारण ग्रामीण भागातील मुलांमध्ये जिद्द असते जिद्द ही कुठही विकत मिळत नाही तर ती मनात निर्माण करावी लागते. पालकांनी घरी गेल्यानंतर मोबाईमधून वेळ काढून आपल्या मुलांसाठी वेळ द्यावा आपली संस्कृती, परंपरा, जिव्हाळा जपण्याची गरज निर्माण झाली आहे. मुलांसोबत सहकारी म्हणून रहा आणि त्यांना प्रत्येक गोष्टीची जाणीव करुन द्या तरच ते यशस्वी नागरिक होतील असा विश्वास वाटतो जगतील चांगले शिक्षण आपल्या मुलांना द्या नव्या शैक्षणिक धोरणात जगातील चांगले शिक्षण भारतात मिळण्याची संधी येणार्या काळात मिळणार आहे त्यामुळे पालकांनी विद्यार्थ्यांसोबत आपले पणाचे नाते निर्माण करुन त्यांच्या गुणवत्तेचा विकास करण्यासाठी बळ द्यावे असे आवाहन केले. तर यावेळी उपस्थितांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत दादा गित्ते, प्राचार्य सूर्यकांत चवळे, संस्थेचे पदाधिकारी दत्तप्रकाश गित्ते, मनोज गित्ते, सौ.सावली मनोज गित्ते व इतरांनी केले. या कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात पालकवर्ग, हितचिंतक, सहकारी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

# कथनी और करणी यात फरक न करणार नेता म्हणजे विनायकराव मेटे

### शहेंशाहवली दर्गा विकास कामांच्या भूमिपूजनप्रसंगी डॉ.ज्योती मेटे यांचे प्रतिपादन

**बीड । वार्ताहर**

लोकनेते स्व.विनायकराव मेटे साहेब यांच्या प्रयत्नाने मंजुर २१५.२६ लक्ष रुपयांच्या बीड येथील हजरत शहेंशाहवली दर्गा विविध विकास कामांचा भुमिपूजन सोहळा आज रवीवार ,दि. ११ फेब्रुवारी रोजी दुपारी .डॉ.ज्योती विनायकराव मेटे यांच्या हस्ते संपन्न झाला यावेळी मंचावर मुस्लिम धर्मगुरू, माजी आ. शिराज देशमुख, जहीर कादरी, मोईन मास्टर, फारुक पटेल, शेख निजाम, शेख शफीक भाऊ , मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक बी बी जाधव, शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष नारायण काशीद,अनिल घुमरे ,सुहास पाटील,नवनाथ प्रभाळे आदी प्रमुख पदाधिकारी, तसेच प्रतिष्ठित मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत शहेंशाहवली दर्गा येथे संपन्न झाला.




मागील अनेक वर्षापासून विकासापासून दूर असलेल्या शहेंशाहवली दर्गा परिसर विकासाच्या प्रतीक्षेत होता मात्र याकडे दुर्लक्ष करण्यात आले बीड येथील ऐतिहासिक सांस्कृतिक वारसा जपला पाहिजे या हेतूने लोकनेते विनायकराव मेटे यांनी बीड येथील श्रीक्षेत्र कंकालेश्वर आणि हजरत शहेंशाहवली दर्ग्याला जवळपास सात कोटी रुपयांचा विकास निधी मंजूर करून आणला स्वर्गीय विनायकराव मेटे यांच्या दुर्दैवी निधनानंतर त्यांच्या पश्चात डॉ.ज्योती मेटे यांनी पाठपुरावा करत या कामांचे भूमिपूजन करत विकास कामांना चालना दिली आहे.महाराष्ट्राला सांस्कृतिक संपन्न वारसा आहे त्याला बीड जिल्हा देखील अपवाद नाही त्यामुळे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जपला पाहिजे या हेतूनेच आज आपण या ठिकाणी विकास कामांचा शुभारंभ करत आहोत. मागील अनेक वर्षापासून या ठिकाणी विकास झाला नाही परंतु समाज घटक म्हणून लोकप्रतिनिधी समाज सुधारक आणि सर्वांची जबाबदारी आहे आपल्या भागाचा विकास झाला पाहिजे. विनायकराव मेटे यांनी बीडचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्याचा संकल्प हाती घेतला होता.आज त्याची स्वप्नपूर्ती होत आहे. तसेच कथनी और करणी यात फरक न करणारा नेता म्हणजे विनायकराव मेटे होते असे मत यावेळी डॉ. ज्योती मेटे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमानंतर उपस्थित असलेल्या सर्व भाविक भक्तांसाठी जेवणाची व्यवस्था करण्यात करण्यात आली होती. याप्रसंगी नगरसेवक अशफाक इनामदार, जयतुल्ला खान, सादिक अली, जलील पठाण,शेख सादिक, नबिल जमा, हाफिस इनामदार मुन्ना इनामदार मतीन शेख, शेख शाकीर, शेख पाशाभाई, शहाबाज कादरी, अजीम इनामदार, इरफान पटेल शेख इलियास, हनीफ इनामदार हे उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अल्पसंख्यांक शिवसंग्राम नेते शेख अखिल भाई, शेख कुतुब भाई, शेख अजहर भाई, शेख लालाभाई, अमजद पठाण, शेख आबेद, अख्तर पेंटर, शकील खान, सलमान अली, अयुब पठाण, मोहम्मद गुलाब बागवान, मुजीब इनामदार सय्यद अजमत अली, राजू पठाण, व शेख रहीम नेता यांनी मेहनत घेतली.मागील पन्नास वर्षापासून दर्ग्याचा विकास झाला नाही याबाबत फक्त राजकारण करण्यात आले विनायकराव मेटे यांनी याकडे लक्ष घालून यासाठी निधी उपलब्ध करून दिला मेटे साहेब हे फक्त बोलणारे नेते नव्हते तर ते प्रत्यक्षात काम करणारे नेते होते मुस्लिम आरक्षणाबाबतीत देखील फक्त गप्पा न मारता विधानसभेत आवाज उठवण्याचे काम केले त्यामुळे मेटे साहेब हे बोले तैसे चाले या युक्ती प्रमाणे काम करणारे नेते होते असे शिवसेनेचे शहर अध्यक्ष शेख निजाम यांनी म्हंटले.मुस्लिम आरक्षणाबाबत बाहेर गप्पा मारणे सोपे असते परंतु विधानसभेत मुस्लिम आरक्षण प्रश्न मांडणे याला ताकद लागते आणि मेटे साहेबांनी ताकतीने मुस्लिम आरक्षण प्रश्न विधानसभेत मांडला हे फक्त मेटे साहेबच करू शकतात असे मत एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शेख शफिक भाऊ यांनी व्यक्त केलेअडचणीच्या काळात मदत करणारा नेता पुढचा व्यक्ती मग तो कोणत्याही पक्षातला असो किंवा कोणत्याही जाती धर्मातील मेटे साहेब त्यांना सढळ मनाने मदत करत मंचावर उपस्थित असलेल्या फारुख पटेल हे एक उदाहरण आहेत. अडचणीच्या काळात फारूक पटेल यांना मेटे साहेबांनी मदत केली. असे मोहीन मास्टर यांनी आपल्या भाषणात सांगितले.मुस्लिम समाजाचा सच्चा दोस्त मेटे साहेब होते. समाजाच्या मनात सदैव मेटे साहेब अमर राहतील – माजी आ.सिराज देशमुख

# निखिल वागळे यांच्या वरील हल्ल्याचा पाटोदा पत्रकारांच्या वतीने जाहीर निषेध

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील विविध पत्रकार संघटनांनी मराठी पत्रकार परिषद, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, पाटोदा तालुका पत्रकार संघ, लोकशाही पत्रकार संघ मधील हल्ला विरोधी कृती समिती, डिजिटल मिडियाचे सर्व पदाधिकारी सदस्य पत्रकार यांच्या वतीने मुख्य विश्वस्त एस एम देशमुख सर यांच्या आदेशाने पाटोदा पोलीस निरीक्षक अनमोल केदार यांना निवेदन सादर करण्यात आले.



पत्रकार निखिल वागळे यांच्या गाडीवर पुण्यात हल्ला करण्यात आला आहे. या झुंडशाहीच्या विरूध्द सर्वांनी व्यक्त झालं पाहिजे. या हल्ल्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी व या मधील दोषींवर कठोर कारवाई करावी या मागणीसाठी दिनांक १२ फेब्रुवारी-२०२४ सोमवार रोजी दुपारी १:०० वाजता पाटोदा पोलिस स्टेशनमध्ये सहाय्यक पोलिस निरीक्षक अनमोल केदार यांना मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने लेखी निवेदन देण्यात आले. या प्रसंगी पाटोदा तालुका मराठी पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, तसेच लोकशाही पराकार संघ आदीनी निषेध व्यक्त करत पोलीस प्रशासनाला लेखी निवेदन सादर करण्यात आले. या वेळी मराठी पत्रकार परिषदेचे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच जेष्ठ पत्रकार अ.कादर मकराणी, विलास भोसले, पोपट राऊत, श्रीरंग लांडगे, विजय जोशी, विजय जाधव, अजय जोशी, इद्रीस चाऊस, भाऊसाहेब पवार, हमीदखान पठाण, जावेद शेख, संजय सानप डिगंबर नाईकनवरे, सय्यद इम्रान, अजिज शेख, बबन पवार, हरिदास शेलार, गणेश शेवाळे, राहुल सोनवणे यांच्या वतीने पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले.या वेळी मराठी पत्रकार परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसह सर्व पत्रकार संघाचे पदाधिकारी, पत्रकार बहुसंख्येने उपस्थित होते.

# माहोरा येथे अटल बांधकाम कामगार आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**माहोरा । मुरलीधर डहाके**

सशासन स्तरावरून बांधकाम कामगार रोजगार यांच्या साठी आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले त्यामध्ये प्रामुख्याने बांधकाम कामगार यांच्या साठी तपासणी करून घेण्याचे आवाहन ग्रामपंचायत तर्फे करण्यात आले होते. तसेच तपासणी शिबीर मध्ये सी.बी .सी.कॅन्सर, रक्त गट, होमोग्लोबिन, अशा अनेक तपासण्या या माध्यमातून बांधकाम कामगारांच्या तपासण्या होणार आहे. शासन दरबारी बांधकाम कामगारांच्या तपासण्या करून घेतल्या बद्दल बांधकाम कामगार यांनी शासनाचे भरभरून कौतुक केले.बांधकाम कामगारांनी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. परिसरातील बांधकाम कामगार आरोग्य तपासणी केल्यामुळे आनंद व्यक्त करताना दिसत आहे.





### बीड बायपास जिरेवाडी प्रलंबित कामामुळे दुसरा बळी

# राष्ट्रीय महामार्ग विभाग लातूर सहायक अभियंता उपविभाग,व गुत्तेदार यांच्यावर गुन्हा दाखल करा

**बीड** –परळी तालुक्यातील जिरेवाडी बायपास रस्त्यावर एका नाला बांधकाम ठिकाणी पुलाच्या पाईपला कार धडकून कार खड्ड्यात कोसळल्याची घटना रविवारी मध्यरात्री साडेअकरा वाजता घडली. या अपघातात कारमधील वानटाकळी येथील रहिवाशी असलेले परळी येथे रुग्णसेवा करणारे डॉ. वाल्मीक मुंडे हे जागीच ठार झाले. तर डॉ. प्रवीण खाडे हे जखमी झाले आहेत. जखमी डॉ. खाडे यांना उपचारासाठी अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात हलविले आहे.

जिरेवाडी बायपास रोडवर गावा लगत एका ठिकाणी नाला पुलाचे काम चालू असून या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा दिशादर्शक बोर्ड लावलेला नाही. नाला काम अर्धवट असल्याने रस्त्यात पाईप पडलेले आहेत. यामुळे वाहन चालविताना अनेक अडचणी येत आहेत. या रस्त्यावरून डॉ प्रवीण खाडे व डॉ.वाल्मीक मुंडे हे दोघेजण कारने जिरेवाडी रविवारी रात्री अकराच्या सुमारास येत होते. नादुरुस्त रस्त्याच्या अंदाज न आल्याने कार रस्त्यावरील पाईपला धडकुन खाली खड्ड्यात कोसळली. त्यात डॉ. वाल्मीक मुंडे यांचा मृत्यू झाला. तर डॉ खाडे हे जखमी झाले आहेत. गरीब रुग्णांचा आरोग्यदूत हरपला! डॉ वाल्मीक मुंडे हे नाममात्र दरात रुग्णांची सेवा करीत होते त्यामुळे परळी व परिसरात ते लोकप्रिय झाले होते .त्यांचे मूळ गाव परळी तालुक्यातील नागापूर जवळील वानटाकळी हे आहे .डॉ. मुंडे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले ,एक भाऊ, चार बहिणी असा परिवार आहे . अपघातास गुत्तेदार आणि प्रशासन कारणीभूत गेल्या काही दिवसात जिरवाडी बायपास रस्त्यावर तिघांचा वेगवेगळ्या अपघातात मृत्यू झाला आहे. तसेच मोटर सायकल व ऑटो रिक्षांचे अपघात झाले आहेत..बायपास रस्ता पूर्ण झाला आहे. परंतु नाला काम काही महिन्यापासून रखडल्यामुळे अपघात होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.सदरील दुर्घटना ही संबंधित कत्राटदार व कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग लातूर याच्या दुर्लक्ष हलगर्जी पणामुळे घडत आहेत, असे सर्व नागरिकांचे मत असल्यामुळे प्रशासन व गुत्तेदारांची हलगर्जी कारणीभूत असल्याचे ग्रामस्थांनी म्हटले आहे.त्यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करावे असे नागरिकांचे म्हणणे आहे.





# चंद्रपूरचा असा ही एक अवलिया दिव्यांग-निलेश पाझारे

## पार्थशर समाचार कडून रत्न पुरस्कारने सन्मानित

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

एखादे ध्येय उराशी बाळगूण त्यासाठी झपाटल्यागत कार्य करणारे, कितीही प्रतिकूल परिस्थिती असली तरी त्यावर मात करून निस्वार्थीपणे वाटचाल करणारे आजच्या काळात फारच दुर्बलतेनेच आढळतात. त्यातही स्वतः दिव्यांग असून एखाद्या स्वस्थ व्यक्तीला सुद्धा लाजवेल अशा रितीने कृतीशील जीवन जगणारा एक अवलिया प्रवृत्तीचा व्यक्ती म्हणजेच चंद्रपूरचा निलेश स्मिता योगेश पाझारे . १६ जानेवारी २००७ ला एका भीषण अपघातात एक पाय गमावला, त्यात दुसऱ्या पायालासुद्धा बरेच जखमा झाल्या होत्या. यातुन स्वतःला सावरण्यासाठी व स्वतःच्या पायावर चालायला किमान १-२ वर्ष लागेल अशी अवस्था होती. पण या अपघात मधून स्वतःला सावरत व स्वतःच्या पायावर उभे राहून चालायचे या जिद्दीमुळे तो अवघ्या ४ महिन्यांतच वॉकर घेवून चालु लागला. स्वतः दिव्यांग होण्याच्या अगोदर बाबा आमटे यांचे कार्य पाहून दिव्यांग समुदायासाठी कार्य करायची आवड होती. समाजासाठी आपले काहीतरी देणे आहे हे निलेशला त्याच्या आई-वडील कडून वारसा मिळाला आहे. निलेशच्या तोंडून नेहमी जन्मदात्या आई-वडीलांचे नाव निघत असते वेळप्रसंगी तो त्यांच्या कार्याचं उदाहरण देखील देत असतो.हाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून दिव्यांग समुदायासाठी निलेशने काम करणे सुरु केले. दिव्यांगाला दिव्यांग प्रमाणपत्र तयार करून देणे, बस-रेल्वे सवलत करून देणे, दिव्यांगासाठी केंद्र व राज्य शासनाच्या योजनाची माहिती देणे, स्थानिक स्वराज्य संस्थेत कोणत्या योजना राबिल्या जातात याची माहिती देणे. शासनाने किंवा सामाजिक संस्थानाने दिव्यांग साठी काही शिबीर, मार्गदर्शन कार्यक्रमांचे आयोजन केले असेल तर ती माहिती जिल्ह्यातील दिव्यांगबांधवा पर्यंत नचुकता पोहोचविणे. दिव्यांगांचे जीवनमान उंचावण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातून नाविन्य पूर्ण योजना तयार करून राबविता येणार का यासाठी सातत्याने पाठपुरावा करत राहून त्या योजना राबविणे. याचा सकारात्मक परिणाम हा आहे कि संपूर्ण महाराष्ट्रात दिव्यांग समुदाय साठी चंद्रपूर जिल्ह्यामध्ये अनेक स्वयंरोजगाराच्या योजना राबविल्या जातात.अपघातात आलेल्या दिव्यांगत्वाचे दुःख कुरवडत बसण्यापेक्षा त्यावर प्रखर व दुर्दम्य अशा इच्छा शक्तीच्या बळावर हावी होऊन समाजातील हतबल व आनंदी जगण्याचा बळ गमावून बसलेल्या दिव्यांग बांधवांसाठी निलेशचे कार्य एखाद्या दिपस्तंभसारखे प्रेरणादायी आहे. याचीच दाखल घेत पार्थशर समाचार चंद्रपूर यांच्या तर्फे २०२४ चे चंद्रपूर रत्न हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. आपल्या निस्वार्थ सेवेच्या माध्यमातून समाजाच्या विशेषता दिव्यांग बांधवांच्या कल्याणासाठी झटणाऱ्या या हुरहुन्नरी अवलिया व्यक्तिमत्वाला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व शुभकामना.चंद्रपूर पार्थशर समाचारच्या वतीने निलेश पाझारे यास चंद्रपूर रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल कल्पना शिंदे, पुष्पा सावसाकडे, दर्शना चाफले, स्नेहल कन्नमवार, गीता भडके, रश्मी करिये, भाग्यश्री कोलते, मुन्ना खोब्रागडे, सतीश मुल्लेवार, पंकज मिश्रा, रवींद्र उपरे, सुभाष मोहुर्ले, शिवसागर चंदनखेडे, शिवशंकर कोलते, भास्कर कांबळे, हिरा सोनदरकर, जयकुमार पवार, प्रमोद डोंगरे, प्रफुल सोमनकर, मनोज पिपरे, नंदा सातपुते, सतीश कोलते, उत्तम साव, अर्पिल चौधरी, मनोज अस्वले, निसार खान, राहुल खटी, आदिंनी त्याचे अभिनंदन केले आहे.




# जलयुक्त शिवार अभियानाचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्यावतीने जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियान २.० राबविण्यात येत असून शासनाचे महत्वकांक्षी अभियान आहे. या अभियानाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी आज वीस कलमी सभागृहात आढावा बैठक घेतली. तसेच सुधारीत आराखडे असल्यास मंजुरीसाठी पाठविण्याच्या सुचना दिल्या.





बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू, उपजिल्हाधिकारी (रोहयो) अजय चरडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार, विभागीय वन अधिकारी प्रशांत खाडे, सहाय्यक वनसंरक्षक महेश चोपडे, राजुराचे उपविभागीय जलसंधारण अधिकारी पोहन बल्की, मूलचे तालुका कृषी अधिकारी प्रशांत कसराळे तसेच दूरदृष्टी प्रणालीद्वारे संबंधित तालुक्याचे उपविभागीय अधिकारी उपस्थित होते.जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, संबधित उपविभागीय अधिकाऱ्यांनी तालुकास्तरावर आराखडे तपासावे, काही फेरबदल असल्यास सुधारीत आराखडे मंजुरीसाठी पाठवावेत. अंतिम आराखडा करतांना नियतव्यय बघून तसेच प्रत्येक विभागाच्या समन्वयातुन नियोजनबद्ध पदधतीने तयार करावा. तालुकानिहाय प्रत्येक कामांची यादी तयार करावी. पुर्णत्वास आलेली तसेच प्रगतीपथावर असलेल्या कामांची सद्यस्थिती तपासून सदर कामे पोर्टलवर अपडेट करावीत. तसेच प्रत्येक गावाचा आराखडा गटविकास अधिकाऱ्यांच्या मदतीने ग्रामसभेत ठेवून मंजूर करून घ्यावा. उपविभागीय अधिकाऱ्यांनी प्रत्येक विभागाशी समन्वय ठेवून आराखडा तयार करावा तसेच तालुकास्तरावर नियमित बैठका घेऊन सदर आराखडा सदस्य सचिवाच्या स्वाक्षरीने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे पाठवावा. त्यासोबतच, प्रशासकीय व तांत्रिक मान्यता मिळालेल्या कामांची कार्यवाही तसेच निधी वितरण तातडीने करण्याच्या सुचना संबधित यंत्रणांना दिल्या. यावेळी जिल्हाधिकारी गौडा यांनी विभागनिहाय एकूण मंजूर व प्रगतीपथावर असलेल्या कामांची सद्यस्थिती जाणून घेतली.

# भिसी बसस्थानकाचा फलक दाखवतोय प्रवाश्यांना वाकुल्या

## एक वर्षापासून रेगांळलेले अपुर्ण कामे थंडबस्त्यात

**चिमूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील भिसी हे २० हजार लोकसंख्येचे शहर असून आजस्थितीत अप्पर तालुका तसेच नगर पंचायतचा दर्जा प्राप्त असलेले गाव आहे. याचबरोबरच मोठी व्यापारपेठ, तीन माध्य. शाळा, दोन कनिष्ठ महाविद्यालय, एक महाविद्यालय, ब्रिटिशकालीन पोलीसस्टेशन, दोन नॅशनल बँक, एक मध्यवर्ती सहकारी बँक, चार पतसंस्था असा आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक विचारांचा वारसा लाभलेलं हे शहर आहे. परंतू एक वर्षापासून भिसी बसस्थानकाचे काम परिपूर्ण न झाल्याने भिसीवासी नागरिक व प्रवासी उद्घाटनाच्या प्रतिक्षेत आहे.




आता काही दिवसात उन्हाळ्याला सुरूवात होईल, पण प्रवाशांसाठी कोणत्याच सुविधा नसल्याने हाल होत आहे. मागील एक वर्षापासून बसस्थानकाचे बांधकाम पूर्ण होऊन तयार असून देखील वीज जोडणीचे व पिण्याचे पाणी व इतर काही कामे न झाल्याने उद्घाटन रेगांळलेलेच आहे.भिसीच्या बसस्थानकावरुन रोज शेकडो प्रवासी येणे जाणे करतात. उन्हाळ्यात तर खूप मोठी वर्दळ असते. भिसीच्या आसपास तीस-पस्तिस गावे असल्याने तेथील नागरिकांचे आवागमन रोजच असते. त्यामुळे त्यांनाही बस स्थानक नसल्याने त्रास सहन करावा लागत आहे. प्रवाशांच्या बहुप्रतिक्षेत असलेल्या व अपुर्ण बांधकाम असलेल्या बसस्थानकातील शिल्लक असलेल्या सोयीकडे या क्षेत्रातील आमदार किर्तिकुमार भांगडीया हे लक्ष देतील का असा प्रश्न निर्माण झाला आहे. यांत्रिक -तांत्रिक समस्या, किंवा प्रशासकीय पातळीवरील भिसी बसस्थानकाची वाटचाल कासवगतीने होत असल्यास याकडे गांभीर्याने आमदार किर्तिकुमार भांगडीया यांनी लक्ष द्यावे, अशी मागणी भिसी व परिसरातील प्रवाशांनी केली आहे. तरी या अपुर्ण असलेल्या भिसी बसस्थानकाचे कामे पूर्ण करून भिसी व परिसरातील प्रवाशांनी लवकरात लवकर बसस्थानकाचे उद्घाटन करावे अशी मागणी प्रवाशांकडून केल्या जात आहे.

# महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राद्वारे नि:शुल्क प्लास्टिक प्रोसेसिंग प्रशिक्षण

**चंद्रपूर**–महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र चंद्रपूरद्वारा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत नि:शुल्क प्लास्टिक प्रोसेसिंग प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहे. त्याकरीता गुरुवार, दि. १५ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११ वाजता सिपेट, एम.आय.डी.सी., इंडस्ट्रियल एरिया, ताडाळी, चंद्रपूर येथे मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे.तरी, प्रशिक्षणास इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीकरीता १५ फेब्रुवारी २०२४ रोजी एम.सी.इ.डी, उद्योग भवन, दुसरा मजला, गाळा क्र. २०८, बस स्टँड समोर, चंद्रपूर येथे हजर राहावे. अधिक माहितीकरीता एम.सी.ई.डी.चे प्रकल्प अधिकारी संदीप जाने (९६३७५३६०४१) किंवा कार्यक्रम समन्वयक, शितल वाघमारे (९०११६४७०७५) या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे एम.सी.ई.डी.चे प्रकल्प अधिकारी संदीप जाने यांनी कळविले आहे.

# आनंद निकेतन महाविद्यालयात शेअर मार्केट व म्युचल फंड;संधी आणि आव्हाने या विषयावर व्याख्यान

**आनंदवन । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती द्वारा संचालित आनंद निकेतन महाविद्यालय आनंदवन वरोरा येथे अर्थशास्त्र विभागाच्या वतीने शेअर मार्केट व म्युच्युअल फंड: संधी आणि आव्हाने या विषयावर सोमवार दिनांक १२ फेब्रुवारी २०२४ ला महाविद्यालयाच्या सभागृहात व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मृणाल काळे हे होते.




कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते अरुणकुमार सिंग, एमबीए इन्शुरन्स अँड फायनान्शियल प्लॅनर वरोरा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी बोलताना ते म्हणाले की,'अजूनही भारतीय लोकांच्या मनात गुंतवणूक करण्याबद्दल जागृती नाही. प्रत्येक भारतीयांनी व विद्यार्थ्यांनी संपत्तीच्या बाबतीत स्वतः आत्मनिर्भर होऊन आत्मविश्वास निर्माण केला पाहिजे. यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी मोलाचे ठरले. तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून लाभलेले मा. मिथुन खडसे यांनी, विद्यार्थ्यांना जेवढी जोखीम जास्त स्वीकाराल तेवढाच नफा जास्त होईल आणि मागणी व पुरवठा यामधील व्यस्त प्रमाण समजून सांगितले. याप्रसंगी गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत आनंद निकेतन महाविद्यालय येथील अर्थशास्त्र या विषयात प्रथम मेरिट आलेली पल्लवी एकनाथ जीवतोडे व तृतीय मेरिट कु.हेमलता प्रदीप डाहुले यांचा सत्कार करण्यात आला. अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. नरेंद्र पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. भारतीय लोकांच्या मनात शेअर मार्केट व म्युचल फंड बद्दल अजूनही भीती आहे आणि त्यामुळे ते गुंतवणूक करू शकत नाही. विकसित देशाच्या तुलनेत भारतातील लोकांचे गुंतवणूक करण्याचे प्रमाण खूपच कमी आहे. कार्यक्रमाच्या याप्रसंगी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून झालेल्या व्याख्यानावर वेगवेगळी प्रश्न विचारून त्यांना बक्षीस देण्यात आली. त्यामध्ये लोचनी कोहळे, चेतन कामटकर, दीपांश नन्नावरे, ईश्वर डाकोरे , अमित गाढवे आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पल्लवी जीवतोडे तसेच प्रा. मनीषा बारसागडे यांनी केले आभार प्रदर्शन प्रा. तनुजा वैद्य यांनी केले. अर्थशास्त्र विषयाचे प्रा. सागर मांडवकर याप्रसंगी उपस्थित होते. या कार्यक्रमाला उत्स्फूर्तपणे विद्यार्थ्यांचा सहभाग लाभलेला होता.

# १२ ते २१ फेब्रुवारी कालावधीत पी.एम.किसान योजनेअंतर्गत देशव्यापी संपृक्तता मोहीम

**चंद्रपूर**–पी.एम.किसान योजनेअंतर्गत १२ ते २१ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत सामायिक सुविधा केंद्रामार्फत दहा दिवसांची देशव्यापी संपृक्तता मोहीम राबविण्यात येत आहे.सदर मोहिमेदरम्यान जिल्ह्यातील केवळ ई-केवायसी प्रमाणीकरण प्रलंबित असल्याने योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना पात्र करण्यासाठी सामाईक सुविधा केंद्र व ग्रामस्तरीय नोडल अधिकारी यांच्यामार्फत ई-केवायसी प्रमाणिकरण पूर्ण करण्यात यावे.जिल्हा नोडल अधिकारी, पी.एम.किसान तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी सामाईक सुविधा केंद्रामार्फत प्रलंबित लाभार्थ्यांचे प्रमाणीकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सामाईक सुविधा केंद्राच्या अधिकाऱ्यांसह संबंधित सर्व यंत्रणाची बैठक आयोजित करावी, असे निवासी उपजिल्हाधिकारी तथा पी.एम. किसान योजनेचे नोडल अधिकारी संजय पवार यांनी कळविले आहे.

# गोठ्यात शिरून वाघाने दोन बकरे केले ठार

**तळोधी (बा.) । प्रतिनिधी**

वाघाने थेट गावात प्रवेश करून गेंदूमिया शेख यांच्या गोठ्यातून दोन बकरे ठार केल्याची घटना मंगळवारी(दि.१३ फेब्रुवारी) पहाटेच्या सुमारास नागभीड तालुक्यातील झाडबोरी येथे घडली.यामुळे या गरीब मजूराची मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.दरम्यान हल्लेखोर वाघ हा बिबट असल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे .



तालुक्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या गिरगांव गट ग्रामपंचायत अंतर्गत झाडबोरी हे गाव आहे.येथील नागरिकांना अधून मधून वाघाचे दर्शन होत असल्याची माहिती आहे.दरम्यान मंगळवारी वाघाने एक पाऊल पुढे करून थेट गावात प्रवेश केला. आणि गेंदूमिया शेख या गरीब मजूराच्या घरील गोठ्यातून दोन बकऱ्यांना ठार केले.यापैकी एक बकरा तिथेच ठार करून दुसरा बकरा वाघाने पळविला आहे.यामध्ये या गरीब मजूराची ३५ ते ४० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.सदर घटनेची माहिती तळोधी वनपरीक्षेत्र विभागाला देण्यात आली असून वन कर्मचाऱ्यांनी पंचनामा केला आहे.या घटनेमुळे गावात वाघाची प्रचंड दहशत पसरली आहे.गेंदूमिया शेख यांची परिस्थिती फारच हलाखीची असल्याने त्यांच्यासाठी ही फार मोठी आर्थिक हानी आहे.त्यांना तातडीने वनविभागाने मदत द्यावी.अशी मागणी गिरगांव गट ग्रा.पं.सदस्य हसीम सय्यद, झाडबोरी यांनी केली आहे.

# आनंदवन कृषी तंत्र विद्यालय येथे ग्रामीण युवक कृषी कौशल्य प्रशिक्षणाला सुरुवात

**आनंदवन । प्रतिनिधी**

सिंजेंटा फाउंडेशन इंडिया व आनंदवन कृषी तंत्र विद्यालय, वरोरा, यांच्या संयुक्त विद्यमाने महारोगी सेवा समिती, वरोरा द्वारा संचालित, डॉ. पं.दे.कृ.वि अकोला संलग्नित आनंदवन कृषी तंत्र विद्यालय, वरोरा, येथे ग्रामीण युवक कृषी कौशल्य २२ दिवसीय प्रशिक्षण उद्घाटनाचा कार्यक्रम दिनांक १२ फेब्रूवारी ला पार पडला.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुधाकर कडू विश्वस्त म.से.स आनंदवन, डॉ. सुहास पोतदार, प्राचार्य, आनंद निकेतन कृषी महाविद्यालय, वरोरा व रवी गोरलेवार, फिल्ड मार्केटिंग मॅनेजर, सिंजेंटा फाउंडेशन इंडिया तसेच हर्षदा पोतदार, प्राचार्य, आनंदवन कृषी तंत्र विद्यालय, आनंदवन उपस्थित होते. तसेच सिंजेंटा फाउंडेशन इंडिया, पुणे चे राजेंद्र जोग, विक्रम बोराडे, रवी कटरे, डॉ. राजेन्द्र देशमुख यांनी ऑनलाइन रित्या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली.याप्रसंगी माननीय रवी गोरलेवार, यांनी, प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षणाची रूपरेषा सांगितली तसेच प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना भविष्यात येणाऱ्या रोजगार संधींविषयी माहिती दिली. सुधाकर कडू यांनी विद्यार्थ्यांना जीवनात प्रशिक्षणाच्या महत्वाबाबत मार्गदर्शन केले.

डॉ.एस.एस.पोतदार यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक शेती तसेच तंत्रज्ञानाबाबत महत्वाचे मार्गदर्शन केले. हर्षदा पोतदार यांनी सिंजेंटा फाउंडेशन सोबत असलेला सहवास व सहकार्य याबाबत मोलाचे मार्गदर्शन करून प्रशिक्षनार्थ्यांना प्रशिक्षणाचे महत्त्व सांगितले. याप्रसंगी कार्यक्रमाला २५ प्रशिक्षणार्थ्यांनी सहभाग नोंदविला. हे प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यास मॅनेज हैद्राबाद या संस्थेकडून प्रमाणपत्र देण्यात येईल. तसेच प्रशिक्षणाचा फायदा म्हणजे प्रशिक्षनार्थ्यांना दोन महिन्याची इंटर्नशिप सिंजेंटा फाउंडेशन इंडिया तसेच इतर कंपन्यामधून देण्यात येईल जेणेकरून विद्यार्थी आधुनिक पद्धतीने स्वतःची शेती करू शकतील तसेच विविध कंपनी अंतर्गत रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.कार्यक्रमाला सीमा बुऱ्हाण, अतुल देवगडे व अश्विनी बोढाले तसेच विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .